# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक ०७/०४/२०१७

## *पोलीस - नक्षल चकमकीमध्ये* मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त

गोपनिय माहितीच्या आधारे उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत उपपोस्टे रेपनपल्ली हद्दीत येणाऱ्या मौजा कोलामरका जंगल परिसरात विशेष अभियान पथक प्राणहिता नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना आज दिनांक ०७/०४/२०१७ रोजी सकाळी ०९.३० वा. च्या दरम्यान बंदुकधारी नक्षलवादयांनी पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने पोलीसांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरु केला. पोलीस पथकांनीही आत्मसंरक्षणार्थ नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार करत जोरदार प्रत्युत्तर दिले. चकमकीदरम्यान पोलीसांचा दबाव वाढल्याने नक्षलवादयांनी सदर ठिकाणाहून पळ काढला.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पिट्टू, मेडीकल किट, लिखीत साहीत्य आणि दररोज वापराचे साहीत्य असे मोठया प्रमाणावरील नक्षल साहीत्य जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.

सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.